| | | |
|---|---|---|
| ७ MHYA210000912003 | दाखल तारीख | २९/०३/२००३ |
| | नोंदणी तारीख | २९/०३/२००३ |
| | निकाल तारीख | १७/०४/२०२६ |
| | कालावधी | २३ व. ०० म. १८ दि. |

**प्रपत्र–अ**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, वणी, ता.वणी, जि.यवतमाळ**

(पिठासीन अधिकारी **शहाजी दत्तराव भोसले**)

(न्या.अ.सांकेतांक क्र.एम.एच.०२८७३)

**न्यायनिर्णय दि.१७/०४/२०२६**

**नि.फौ.ख.क्र.०६/२००३** **नि.क्र.६५**

(प्रथम खबरी अहवाल तपशील: गुन्हा क्र.०७/२००३, पोलीस ठाणे, **शिरपूर,** ता.वणी, जि.यवतमाळ)

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार,**<br>तर्फे पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे, **शिरपूर**,<br>ता.वणी, जि.यवतमाळ |
| **मार्फत** | विद्वान सहायक सरकारी वकील : श्रीमती एम.डी.वायचाळ. |
| **आरोपीं** | **जगदीश मुकिंदा गेडाम,**<br>वयः ४९ वर्षे, व्यवसायः मजुरी,<br>रा.तुंड्रा, ता.वणी, जि.यवतमाळ. |
| **मार्फत** | विद्वान वकील श्री.डी.एम.खोके. |

**प्रपत्र–ब**

| | |
|---|---|
| गुन्ह्याचा दिनांक | २२/०२/२००३ ते २३/०२/२००३ |

| | |
|---|---|
| प्राथमिक खबरी अहवाल दिनांक | २५/०२/२००३ |
| दोषारोप पत्राचा दिनांक | २९/०३/२००३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०७/०१/२००४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २८/०१/२००४ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १७/०४/२०२६ |
| सजा सुनावणीचा दिनांक, जर असेल | निरंक. |

**आरोपींची माहिती**

| अ. क्र. | नाव | अटक दिनांक | जमानत दिनांक | शिक्षा कलमे | निर्दोष/ शिक्षा | आरोपीस दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता आरोपीचा कोठडीतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जगदिश मुकिंदा गेडाम | १६/०३ /२००३ | १७/०३ /२००३ | भा.दं.वि. कलम ३८० | आरोपीस निर्दोष सोडण्यात आले. | निरंक | निरंक |

**प्रपत्र–क**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष :**

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | रमेश दत्तुजी आसुटकर, नि.क्र.२० | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२ | बजरंग काशिनाथ मेश्राम, नि.क्र.३२ | घटनास्थळ पंच |
| अ.सा.क्र.३ | दत्ता बकाराम वालकोंडे, नि.क्र.३४ | अटक पंच |

| | | |
|---|---|---|
| अ.सा.क्र.४ | सुरेश बालाजी पाचभाई, नि.क्र.३६ | मेमोरेंडम जप्ती पंच |
| अ.सा.क्र.५ | विलास विठुजी चामाटे, नि.क्र.५९ | मेमोरेंडम जप्ती पंच |
| अ.सा.क्र.६ | निर्मला रमेश आसुटकर, नि.क्र.६० | फिर्यादीची पत्नी |
| अ.सा.क्र.७ | शंकर दादाजी निखाडे, नि.क्र.६१ | प्रत्यक्षदर्शी |

**ब.बचाव पक्षाचे साक्षीदार :– निरंक.**

**क.न्यायालयाचे साक्षीदार :– निरंक.**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाचे निशाणी क्रमांक :–**

**अ. अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक :–**

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| १. | नि.क्र.२१/अ.सा.क्र.१ | फिर्याद |
| २. | नि.क्र.२२/अ.सा.क्र.१ | छापील खबर |
| ३. | नि.क्र.३३/अ.सा.क्र.२ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| ४. | नि.क्र.३५/अ.सा.क्र.३ | अटक पंचनाम्यावरील सही |
| ५. | नि.क्र.३७/अ.सा.क्र.४ | आरोपीचे कबुली जबाबावरील सही |
| ६. | नि.क्र.३८/अ.सा.क्र.४ | मेमोरेंडम जप्ती पंचनाम्यावरील सही |

**ब.बचाव पक्षाचे निशाणी क्रमांक :– निरंक.**

**क.न्यायालयाचे निशाणी क्रमांक :– निरंक.**

**ड. वस्तु :– निरंक.**

## न्यायनिर्णय

(पारित दिनांक १७/०४/२०२६)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३७९ नुसार चालविण्यात आला. (यापुढे संक्षेपार्थ "भा.दं.वि."असे संबोधण्यात येते)

**<u>अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,</u>**

०२. रमेश दत्तुजी आसुटकर (सा.क्र.१) यांनी पोलीस ठाणे, शिरपूर, येथे फिर्याद दिली की, दि.२२/०२/२००३ रोजी ते कपडे शिवत असताना आरोपी त्यांचे घरी दारु पिऊन आला व बाजेवर बसला. आरोपी खुप दारु पिऊन असल्यामुळे फिर्यादीने आरोपीला घरी ठेवले व ते कायर येथे बाजाराला गेले. त्यावेळी फिर्यादीची पत्नी घरी नव्हती. फिर्यादी पाच वाजता परत घरी आले व जेवण करुन झोपी गेले.

०३. दि.२३/०२/२००३ रोजी सकाळी १०.०० वाजता फिर्यादीची पत्नी निर्मला आसुटकर (सा.क्र.६) हिने स्वयंपाकाकरीता फिर्यादीस तांदूळ मागितले. तांदूळ असलेल्या पोतेमध्ये आठ हजार ठेवून होते. त्यामुळे फिर्यादी स्वतः कोटीचे कुलप उघडण्यास गेले असता त्यांचे हातात कोंडा आला. फिर्यादीने कोटी उघडून पाहिली असता त्यामध्ये ठेवलेले आठ हजार रुपये त्यांना दिसलेले नाही. तेव्हा फिर्यादीचे लक्षात आले की, आरोपीने कोटीमध्ये ठेवलेले आठ हजार रुपये कोटीचा कडीकोंडा तोडून चोरुन नेले असावे. फिर्यादीची पुतणी प्रिती हिने त्याच दिवशी आरोपीला घरातून निघताना पाहिले. त्यामुळे, फिर्यादीचा आरोपीवर दाट संशय झाला.

०४. फिर्यादीचे फिर्यादवरुन आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, शिरपूर येथे अपराध क्र.०७/२००३ नुसार भा.दं.वि.चे कलम ३८० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पो.हे.कॉ. दामोदर गोपतवार यांचेकडे वर्ग करण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी आरोपीला अटक करुन त्याचा कबुली जबाब नोंदविला, घटनास्थळ व मेमोरेंडम जप्ती पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले

आणि तपासाअंती आरोपीविरुध्द भा.दं.वि.चे उपरोक्त कलमान्वये दोषारोप पत्र दाखल केले.

०५. माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.०७/०१/२००४ रोजी आरोपीविरुध्द नि.क्र.१७ वर भा.दं.वि. कलम ३८० अन्वये दोषारोप ठेवले. त्यातील मजकुर आरोपीला त्याचे मातृभाषेतून वाचून व समजावून सांगीतला. आरोपीने गुन्हा नाकबुल करुन संपरीक्षेस जाण्याची तयारी दर्शविली. आरोपीविरुध्द सकृतदर्शनी पुरावा आल्यामुळे त्याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबानी नि.क्र.६३ वर नोंदविण्यात आली. आरोपीचा बचाव संपूर्ण नकारात्मक आहे. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

०६. खटल्यातील वरीलप्रमाणे आलेल्या माहीतीवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झाले. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र** | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | दि.२३/०२/२००३ रोजी १०.०० वाजता मौजा तुंड्रा, ता.वणी, जि.यवतमाळ येथे आरोपीने फिर्यादीचे घरात जिथे मालमत्तेचे अभिरक्षण केले त्याठिकाणी रोख रक्कम रु.८,०००/– ची चोरी केली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | .. नाही |
| २. | आदेश काय ? | .. अंतिम आदेशाप्रमाणे |

०७. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने प्रपत्र–क प्रमाणे सात साक्षीदारांची साक्ष नोंदविली. त्यानंतर विद्वान विशेष सहायक सरकारी अभियोक्ता यांनी दिलेल्या नि.क्र.६२ वरील पुरसीस नुसार अभियोग पक्षाचा पुरावा

बंद करण्यात आला. आरोपीनी त्याच्या बचावाकरीता पुरावा दिला नाही.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीता –**

०८. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाला असे सिद्ध करावे लागेल की, आरोपीने फिर्यादीचे घरात जिथे मालमत्तेचे अभिरक्षण केले त्याठिकाणी रोख रक्कम रु.८,०००/– ची चोरी केली. त्याकरीता, अभियोग पक्षाला फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी, पंच साक्षीदार, तपास अधिकारी यांच्या पुराव्याची मदत घ्यावी लागेल.

०९. सा.क्र.१/फिर्यादी रमेश आसुटकर यांनी अभियोग पक्षाचे कथनाप्रमाणे कथन केले आहे. पुढे त्यांनी कथन केले की, घटना दुपारी २.०० ते २.३० वाजताच्या दरम्यान त्यांचे घरी घडली होती. ते त्यावेळी शिलाई मशिनवर काम करत होते. तेव्हा आरोपी तेथे दारु पिवून बसला होता. त्यानंतर, ते शिलाईचे सामान घेण्याकरीता कायर येथे गेले. ते घरी आले व जेवून झोपी गेले. दुसऱ्या दिवशी त्यांचे पत्नीने त्यांना कोठी उघडण्यास सांगितले असता त्यांना कोठीतील रु.८,०००/– दिसून आले नाही. त्यांचा आरोपीवर संशय होता. त्यांचे पुतणीने त्यांना सांगितले की, आरोपी त्यांचे घरातून पळून गेला. त्यामुळे, त्यांनी आरोपीविरुद्ध फिर्याद दिली. उलट तपासात त्यांनी कथन केले आहे की, त्यांचे घराला एकच खोली आहे. त्यांचेकडे लोकं केव्हाही येणे–जाणे करतात. पोलीसांनी त्यांना आरोपीवर नजर ठेवण्यास सांगितले होते, त्यामुळे त्यांना फिर्याद देण्यास उशीर झाला. शेवटी, त्यांनी खोटी फिर्याद दिल्याचे नाकारले आहे.

१०. सा.क्र.६/फिर्यादीची पत्नी निर्मला आसुटकर यांनी कथन केले आहे की, अंदाजे २५–२६ वर्षापूर्वी त्यांचे घरी दिवसा घटना घडली होती. त्यादिवशी,

त्यांचा मुलगा संजय याने त्यांना रु.१० हजार आणून दिले व ते त्यांनी कोठीमध्ये ठेवून तिला कुलूप लावले. त्यानंतर, त्या शेतीचे कामाला निघून गेल्या. तेव्हा त्यांचे घरी आरोपी व सा.क्र.७/शंकर निखाडे हे हजर होते. त्या सायंकाळी ५ वाजता घरी आल्या तेव्हा त्यांना कोठीला कुलूप दिसले नाही. त्यांनी कोठी पाहिली असता त्यांना त्यातील रु.१० हजार चोरीला गेल्याचे दिसले. त्यांनी त्यांचे पतीला चोरीची घटना सांगितली. त्यांनी रात्री त्यांची पुतणी प्रिती हिची विचारपुस केली, तेव्हा तिने त्यांना आरोपी घरामध्ये पाणी पिण्याकरीता घरात गेला, असे सांगितले. त्यांचे पतीने आरोपीला पैसेबाबत विचारले असता, आरोपीने पैसे घेतले नाही, असे म्हटले. त्यामुळे, त्यांचे पतीने आरोपीविरुद्ध फिर्याद दिली. उलट तपासात त्यांनी मान्य केले आहे की, पोलीसांनी त्यांची चौकशी करुन त्यांचे बयान नोंदविले नव्हते. पुढे त्यांनी मान्य केले आहे की, त्यांचे पती शिंपी असल्यामुळे त्यांचे घरी लोकांचे येणे–जाणे होते. त्या शेतीचे कामाला गेल्या तेव्हा त्यांचे पती घरी नव्हते. त्यांनी त्यांचे कोठीमध्ये रु.७–८ हजार असल्याचे नाकारले. शेवटी, त्यांनी नाकारले आहे की, त्यांचे पतीने आरोपीला पैसे मागितले असता आरोपीने पैसे देण्यास नकार दिल्यामुळे त्यांचे पतीने आरोपीविरुद्ध खोटी फिर्याद दिली.

११. सा.क्र.७/प्रत्यक्षदर्शी शंकर निखाडे यांनी त्यांना घटनेबाबत काहीएक माहिती नसल्याचे कथन केले आहे. तसेच, सा.क्र.२/पंच बजरंग मेश्राम, सा.क्र.३/पंच दत्ता वालकोंडे, सा.क्र.४/पंच सुरेश पाचभाई व सा.क्र.५/पंच विलास चामाटे यांनी घटनास्थळ पंचनामा, अटक पंचनामा, आरोपीचा कबुली जबाब व मेमोरांडम जप्ती पंचनामा, यावरील त्यांचे केवळ सह्या मान्य केल्या. परंतु, त्यातील मजकुर स्पष्टपणे नाकारला. वरील सर्व साक्षीदारांनी अभियोग पक्षाचे कथनास दुजोरा दिला नाही. त्यामुळे, विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा उलट तपास घेतला. परंतु, त्यांनी अभियोग पक्षाचे कथन स्पष्टपणे नाकारला.

१२. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सा.क्र.१/फिर्यादी रमेश आसुटकर व सा.क्र.६/फिर्यादीची पत्नी निर्मला आसुटकर यांनी आरोपीला प्रत्यक्ष चोरी करतांना पाहिले नाही. त्यामुळे, फिर्यादी व त्यांचे पत्नीला घटनेबाबत प्रत्यक्ष कोणतीही माहिती नसल्याचे दिसून येते. तसेच, त्यांनी केवळ संशयावरुन आरोपीने चोरी केल्याचे कथन केले आहे. त्यांनी त्यांचे पुतणीने आरोपीला त्यांचे घरात जातांना पाहिल्याचे कथन केले आहे. परंतु, अभियोग पक्षाने फिर्यादीचे पुतणीचा पुरावा नोंदविला नाही.

१३. त्याचप्रमाणे, फिर्यादी व त्यांची पत्नी यांनी पुराव्यादरम्यान घटनेबाबत परस्पर विरोधी कथन केले आहे. सा.क्र.१/फिर्यादी रमेश आसुटकर यांनी केवळ आरोपी त्यांचे घरी हजर असल्याचे कथन केले आहे. याउलट, सा.क्र.६/फिर्यादीची पत्नी निर्मला आसुटकर यांनी घटनेचेवेळी त्यांचे घरी आरोपी व सा.क्र.७/शंकर निखाडे हे हजर असल्याचे कथन केले आहे. तसेच, फिर्यादीने त्यांचे कोठीमधील रु.८ हजार चोरी गेल्याचे कथन केले आहे. परंतु, त्यांचे पत्नीने कोठीमधील रु.१० हजार चोरी गेल्याचे कथन केले आहे. अशा परिस्थितीमध्ये, फिर्यादी व त्यांची पत्नी यांचे पुराव्यावर विश्वास ठेवता येत नाही.

१४. सा.क्र.७/प्रत्यक्षदर्शी शंकर निखाडे, सा.क्र.२/पंच बजरंग मेश्राम, सा.क्र.३/पंच दत्ता वालकोंडे, सा.क्र.४/पंच सुरेश पाचभाई व सा.क्र.५/पंच विलास चामाटे यांनी अभियोग पक्षाचे कथनास दुजोरा दिला नाही. त्यामुळे, त्यांचा पुरावा अभियोग पक्षास काहीएक उपयोगाचा ठरत नाही. तसेच, अभियोग पक्षाने प्रकरणातील तपास अधिकारी यांचा पुरावा नोंदविला नाही. त्यामुळे, अभिलेखावर आरोपीकडून चोरी गेलेली रक्कम जप्त करण्यात आली, हे सिद्ध झाले नाही.

१५. वर कथन केल्याप्रमाणे फिर्यादी व त्यांचे पत्नीने एकमेकाशी विसंगती पुरावा निर्माण करणारा पुरावा दिला आहे. तसेच, त्यांना घटनेबाबत प्रत्यक्ष कोणतीही माहिती नाही. त्याचप्रमाणे, त्यांचे पुराव्यास अभिलेखावर पुष्टी देणारा कोणताही पुरावा आला नाही. त्यामुळे, अभिलेखावरील पुराव्यावरुन आरोपीवरील दोषारोप निर्विवादपणे सिध्द होत नाही. म्हणुन, मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.

**मुद्दा क्र.२ करीता –**

१६. मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष लक्षात घेता, आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. प्रकरणातील जप्त रोख रक्कम रु.७७०/– न्यायालयात जमा आहे. सदर जप्त रक्कमेवर कोणीही दावा केला नाही. सदर खटल्यातील फिर्याद सा.क्र.१/फिर्यादी रमेश दत्तुजी आसुटकर यांनी त्याचे घरुन रु.८,०००/– चोरी गेल्याबाबत दाखल केली आहे. त्यामुळे, सदर जप्त रोख रक्कम फिर्यादीस अपील कालावधीनंतर परत करणे न्यायोचीत ठरेल. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे जामीन देण्यात आला आहे.

१७. माननीय मुंबई उच्च न्यायालयाचे फौजदारी अपील क्र.३९०/२०१९, रंजना शांतीलाल सुर्यवंशी–विरुध्द–जयप्रकाश तुळशीराम गुप्ता व इतर मधील फौजदारी अर्ज क्र.३८०/२०१९ वर पारित केलेल्या आदेशाप्रमाणे सदर न्यायनिर्णयाची प्रत फिर्यादीस त्याचे अपील अधिकाराचे माहितीकरीता मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेद्वारे पाठविणे उचीत होईल. सबब, मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष लक्षात घेता, मुद्दा क्र.२ चे निष्कर्षात मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३८० चे शिक्षापात्र गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीनकदबा पुढील सहा महिन्याकरीता कायम करण्यात येतात.

३. जप्त रोख रक्कम रु.७७०/–अपील कालावधीनंतर सा.क्र.१/फिर्यादी रमेश दत्तुजी आसुटकर यांना परत करावी.

४. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे जामीन देण्यात आला.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषित करण्यात आला.)

SHAHAJI DATTARAO BHOSLE

Digitally signed by SHAHAJI DATTARAO BHOSLE
Date: 2026.04.17 18:36:07 +0530

**(शहाजी दत्तराव भोसले)**

दि.१७/०४/२०२६.

न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग),
न्यायालय क्र.१, वणी.

मी, अभय प्रमोद भोयर, लघुलेखक (दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.), वणी) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ. ची सामग्री ही मुळ न्यायनिर्णयाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.